बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
**विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी**
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
**Vishwakarma Institute of Technology**
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २८२ **नोटीस** दि.२५/०८/२०२५

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरून विविध SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC-EBC/Open-EBC/EWS-EBC-/Disability Scholarship/ Orphan/Minority Scholarship शिष्यवृत्ती/फ्रिशीप/ईबीसी व इतर विविध सवलतींकरिता या नोटीसमधील सूचनांचे अनुकरण करून ऑनलाईन अर्ज भरणेबाबत.**

महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षामध्ये प्रथम / व्दितीय/ तृतीय/ अंतिम वर्ष बी.टेक या अभ्यासक्रमासाठी मागास प्रवर्गातून (SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT) तसेच खुल्या प्रवर्गातून (Open-EBC/Open-EWS/SEBC) केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारा (कॅप) शैक्षणिक शुल्कामध्ये विद्यार्थी व पालकांनी दिलेल्या हमीपत्राचे आधारे सवलतीचा लाभ लागू करून प्रवेश घेतलेले आहेत किंवा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रवेश घेणार आहेत त्यांना शासन निर्णयानुसार त्या-त्या प्रवर्गाप्रमाणे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आणि विकास निधी मध्ये फी कमी करून प्रवेश देण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवर्गाप्रमाणे त्यास सवलत दिलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून महाविद्यालयाला होणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. याकामी विद्यार्थ्यास दरवर्षी महाडीबीटी प्रणालीवर जाऊन ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानंतरच अशा विद्यार्थ्यांच्या त्या लागू करण्यात आलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती महाविद्यालयास होणार आहे.

तरी शासनाच्या नियम व अटीनुसार वरील शुल्काच्या प्रतिपूर्तीकरिता पात्र ठरत असलेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी शासनाच्या **https://mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरून विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल सुरू करण्यात आलेले आहे. **तरी शासनाच्या सवलतीकरिता पात्र असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी खालील सूचनांचे तंतोतंत अनुपालन करून आपला ऑनलाईन अर्ज भरून घ्यावा व भरलेल्या अर्जाची प्रत खालील नमूद कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावी व एक प्रत स्वतःकडे जतन करून ठेवावी.** तसेच SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT या मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश **Institute Level/ACAP** प्रवेश या व्दारे प्रवेशित असणाऱ्या व शासनाच्या नियमानुसार व खालील नमूद उत्पन्न गटानुसार पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाणार आहे अशा विद्यार्थ्यांनी देखील वरील प्रमाणे कार्यवाही करावी. खुल्या Open प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश **Institute Level/ACAP** व्दारे झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) या सवलत लागू राहणार नाही याची नोंदी घ्यावी.

**-: विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या सूचना पुढील प्रमाणे: -**

१) विद्यार्थ्यांना शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरील **https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ऑनलाईन अर्ज दि. ३०/०९/२०२५ पूर्वी भरणे आवश्यक व जरूरीचे तसेच अनिवार्य आहे.

२) नव्याने अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्याला **https://mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरू प्रथमतः रजिस्ट्रेशन करून पूर्ण प्राफाईल भरल्यानंतर ऑनलाईन अर्ज करता येणार आहे याची नोंद घ्यावी.

३) नव्याने प्रवेशित/प्रवेश घेणारे (प्रथम व थेट व्दितीय वर्ष बी.टेक) जे विद्यार्थी महाडीबीटीच्या योजनेकरिता पात्र आहे अशा विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरणे अनिवार्य आहे. (सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे ज्या योजनेसाठी विद्यार्थी पात्र आहे त्या योजनेसाठीच अर्ज करणे बंधनकारक राहील)

४) नुतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी Renewal (Second/ Third/ Final Year -B.Tech. Course) च्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी निवडलेल्या योजनेप्रमाणेच महाडीबीटी पोर्टलवरून नुतनीकरणाचे त्वरीत अर्ज भरून घ्यावेत.

५) विद्यार्थ्यांनी योजनेच्या प्रतिपूर्तीकरिता आवश्यक असलेली खालील सर्व ओरिजनल (Original) कागदपत्रे अपलोड करावी. जसे की, 1)Allotment letter (CAP Letter), 2) 10th + 12th Marksheet,4) Diploma Marksheet (if applicable), 4) All Semester marksheet, 5) Income certificate, 6) Leaving Certificate, 7) Domicile Certificate, 8) Caste Certificate, 9) Caste Validity Certificate, 10) Non creamy layer certificate (if applicable), 11) Family Declaration (Parent), 12), College Fee paid receipt 2025-26, 13) Ration Card, 14) GAP certificate (if applicable), 15) Minority Certificate (if applicable), 16) Disability Certificate (if applicable), 17) Aadhar Card & Aadhar linked proof issued by concerned Bank, 18) Bank Account Certificate, 19) Hostel Certificate / Rent agreement 2025-26 (applicable only for GIO Scholarship applied student or Punjabrao deshmukh Nirvahbatta Yojana Students), 20) Alpabhudharak Pramanpatra / Reg. Labour – MANREGA certificate (applicable for - Punjabrao deshmukh Nirvahbatta Yojana Students only, 21) Attendance certificate 2025-26 issued by Class Teacher & HOD in Institute format.

६) विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना, प्रथम प्रवेश घेतलेले वर्ष, सध्याचे चालू असलेले शैक्षणिक वर्ष व शाखा(Branch), महाविद्यालयाचे नाव इत्यादी माहिती भरताना कोणत्याही परिस्थितीत चुक करू नये. यामध्ये माहिती भरताना काही चूक झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याकामी होणाऱ्या आर्थिक नुकसानाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

७) अर्ज भरताना Current course details माहितीमध्ये फी भरली आहे का? असे विचारले आहे तेथे- शून्य (Zero)/असे नमूद करावे परंतू जी फी रिसिप्ट २०२५-२६ विद्यार्थ्यांच्या vierp लॉगीनवर दिलेली आहे ती त्या ठिकाणी अपलोड करावी.

८) महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड त्यांचे बँक खात्याशी लिंक असणे अत्यंत आवश्यक आहे.

९) शासनाचे विहित नमुन्यातील पालकांचे कौटुबिक प्रतिज्ञापत्र (पालकांचे) या नोटीससोबत देत आहोत ते सर्व विद्यार्थ्यांनी ऑलनाईन अर्ज भरते वेळेस अपलोड करणे बंधनकारक आहे. त्यावर पालकांची सही व विद्यार्थ्याची सही असणे अनिवार्य आहे.

१०) नुतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षाच्या दोन्ही ओरिजनल सेमीस्टरच्या एकाच फाईलमध्ये एकत्रित स्कॅन करून pdf बनवावी व ती pdf अपलोड करावी. (do not upload online received pdf copy of result)

११) नुतनीकरणाच्या SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT विद्यार्थ्यांनी नव्याने उत्पन्न दाखला काढण्याची गरज नाही त्यांनी प्रथम प्रवेशित वर्षाचाच म्हणजेच प्रथम/थेट व्दितीय वर्षी प्रवेशाचे वेळी दिलेले उत्पन्न सादर व अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक व जरूरीचे आहे अन्यथा अर्ज फेटाळला जावू शकतो याची नोंद घ्यावी.

१२) Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) या योजनेसाठी (Open-EBC/Open-EWS/SEBC) प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना आर्थिक वर्ष २०२४-२५ चा पालकांचा सर्व बाजूने ग्राह्य धरलेला उत्पनन्नाचा दाखला (valid upto 31st March 2026) अपलोड करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांना आर्थिक वर्ष २०२३-२४ व त्यापूर्वीचा कोणतयही वर्षाचा उत्पन्न दाखला सदर योजनेसाठी लागू होणार नाही.

१३) ST प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना नव्याने काढलेला आर्थिक वर्ष २०२४-२५ चा उत्पन्न दाखला (valid upto 31st March 2026) अपलोड करणे अनिवार्य आहे.

१४) शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीकरिता विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील वर्गातील उपस्थिती ७५% पेक्षा जास्त असणे अनिवार्य आहे. तसे अटेन्डन्स सर्टिफिकेट महाविद्यालयाला विद्यार्थ्यांनी सादर करावे. कभम

१५) विद्यार्थ्याने त्याचा अभ्यासक्रम मध्येच सोडला तर त्याला देण्यात आलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमातील सवलतीची रक्कम शासनाला भरणे अनिवार्य राहील. याबाबत काही शंका असल्यास विद्यार्थ्याने थेट समाज कल्याण विभाग, पुणे /तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शिवाजीनगर / प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग, घोडेगाव, पुणे यांचेशी संपर्क साधावा.

१६) प्रथम / थेट व्दितीय वर्ष बी.टेक च्या विद्यार्थ्यांनी कॅप लेटर/सर्टिफिकेटच्या जागी प्रवेशाच्या वेळी महाविद्यालयाकडून दिले गेलेले **(Receipt cum acknowledgement of confirmation of Admission Letter)** ब्ल्यू /येलो पेजवर प्रिंट झालेले अलॉटमेंट लेटर अपलोड करावे ज्यावर महाविद्यालयाचा शिक्का तसेच अॅडमिशन अॅथॉरिटीची सही आहे.

१७) विद्यार्थ्याला मागील वर्षी शैक्षणिक खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट अपलोड करणे आवश्यक आहे.

१८) Tuition Fees and Examination Fees to OBC or SBC or VJNT Students, या फ्रिशीप योजनेला अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी हॉस्टेल डिसेलसमध्ये हॉस्टेलर आहे का? तर तेथे NO नमूद करावे व Day Scholar सिलेक्ट करावे.

१९) विद्यार्थ्याचे वडिलांचे निधन झालेले असल्यास ज्या विद्यार्थ्यांनी आईचे नावे काढलेला उत्पन्न दाखला त्याचे जवळ असल्यास उत्पन्न दाखला व वडिलांचा मृत्युदाखला/ विद्यार्थ्यांचे पालक विभक्त झाले असल्यास कोर्ट ऑर्डर असे एकत्रित PDF करून अपलोड करावे.

२०) प्रत्येक विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा १२वी/डिप्लोमा इत्यादीचा दाखला अपलोड करावा.

२१) खालील मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश Institute Level/ACAP प्रवेश व्दारे झालेले व ज्या विद्यार्थी महाडीबीटी मधील शिष्यवृत्ती योजनेला उत्पन्न गटानुसार पात्र ठरत आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांनी देखील महाडीबीटीवरून अर्ज भरून सादर करावेत.
SC/ ST/ OBC, SBC, VJ/DT/NT उत्पन्न मर्यादा २.५ लाख पर्यंत करण्यात आली आहे याची नोंद घ्यावी.

२२) सवलतधारक विद्यार्थ्याने महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरला नाही तर त्यास माफ करण्यात आलेले संपूर्ण शुल्क वसूल केले जाईल त्याबाबत कोणाची कोणतीही तक्रार ग्राह्या धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२३) विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज कोणत्याही कारणास्तव नामंजूर झाला किंवा भरला नाही तर विद्यार्थ्यास माफ करण्यात आलेले संपूर्ण शुल्क वसूल केले जाईल याची नोंद घ्यावी.

२४) महाडीबीटीतील काही तांत्रिक कारणास्तव विद्यार्थ्याला अर्ज भरताना अडचण/अडचणी येत असतील तर त्वरीत महाविद्यालय/संबंधित विभाग यांचेशी संपर्क साधावा व अडचणी दूर करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.

२५) विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्जाची स्थिती काय आहे याची माहिती विद्यार्थ्याला त्याचे लॉगीनवर दिसत असते ती माहिती वारंवार विद्यार्थ्यांनी चेक करावी. जोपर्यंत अर्ज शासनाकडून मंजूर होत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांनी त्याचे लॉगीन तपासावे.

२६) विद्यार्थ्याने भरलेला अर्ज त्यांचे लॉगीनवर पुन्हा कागदपत्र/कागदपत्रे अपलोड करणेकरिता वा इतर दुरूस्तीकरिता Sent Back to applicant असा शेरा मारून दुरूस्तीकरीता पाठविला जावू शकतो, अशा वेळेस विद्यार्थ्यांस महाविद्यालयाने /शासनाच्या संबंधित विभागाने सांगितलेली दुरूस्ती करूनच पुन्हा त्याच क्रमांचा अॅप्लीकेशन अर्ज Cancel न करता पुन्हा महाविद्यालयाच्या Approval प्रक्रियेसाठी सादर करणे आवश्यक आहे अन्यथा त्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती/फ्रिशीप/ईबीसीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती होणार नाही त्याकामी विद्यार्थ्याकडूनं सदर रक्कम वसूल केली जाईल याची नोंद घ्यावी.

२७) शासनाने वेळोवेळी केलेले नियम व अटी सर्व सवलतधारक विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

B.R.A.C. TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७ Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व विभागातील नोटीस बोर्डसाठी, २) महाविद्यालयातील सर्व नोटीस बोर्डकरिता-विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करणेकरिता.

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यास लागू असणाऱ्या योजनांचा तपशीलवार माहितीखालील प्रमाणे.

शैक्षणिक वर्ष २५-२६ करिता विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरणे.

| Department | Category | Scheme Names | Parent's Income Limit | Required Documents |
|---|---|---|---|---|
| Social Justice and Special Assistance Department | SC | Government of India Post Matric scholarship | Below 2.5 Lakhs | • Receipt cum Acknowledgement Admission confirmation letter i.e. CAP ID Letter which is issued by VIT admission authority only.<br>• CET/JEE Score Card.<br>• 10th Marksheet<br>• 12th marksheet / Diploma Marksheet.<br>• FY/SY/TY B.Tech both marksheet (All semester for Regular students)<br>• 12th/Diploma- Leaving Certificate<br>• Fresh/EBC Students should be provide Family Income Certificate 2024-25 which is valid for 31st March 2026 of father/parent/guardian which is issued by Tahsildar office.<br>• Father's Death Certificate (if applicable)<br>• GAP certificate (if applicable)<br>• Caste Certificate (if applicable)<br>• Caste Validity Certificate (if applicable)<br>• Non Creamy Layer which is valid upto 31st March 2026 (Applicable only for OBC/SBC/VJNT/SEBC )<br>• Domicile Certificate<br>• Disability Certificate/Orphan Certificate (if applicable)<br>• Ration Card with including student Name<br>• Aadhar Card & Aadhar Link proof issued by Concerned Bank.<br>• Photo copy of Bank Passbook/Cheque (Only student)<br>• पालकांची मराठी प्रतिज्ञापत्र<br>• College Fee paid Receipt 25-26.<br>• Attendance certificate 2025-26 |
| | | Post matrics tuition fee and Exam fee Freeship) | Above 2.5 & above | |
| | (All category) | Post matric Scholarship for person with disability | No Income limit | |
| Tribal Development Department | ST | Post Matric Scholarship Scheme (Govt. of India) | Below 2.5 Lakhs | |
| | | Vocation Education Fee reimbursement | Above 2.5Lakhs | |
| Director of Technical Education | Open/EBC/ EWS/ SEBC | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulka Shishyavrutti Yozana | Upto 8 Lakhs | |
| | Open/EBC /EWS/SEBC | Dr. Punjabrao Deshmukh Vastigruha Nirvaha Yozana | Upto 8 Lakhs | |
| | Minority | Scholarship for students of Minoritys (i.e. Muslim, Sikh, Buddhis, Christian, Parsi Jain, committees pursuing Higher and profession Course (DTE) | Upto 8 Lakhs | |
| VJNT, OBC and SBC Welfare Department | VJNT, OBC and SBC | Post Matrics Scholarship for OBC<br>Post Matrics Scholarship for VJNT<br>Post Matrics Scholarship for SBC | Below 1.5 Lakhs | |
| | | Tuition and Exam Fees for OBC<br>Tuition and Exam Fees for VJNT<br>Tuition and Exam Fees for SBC | Above 1.5 to 8 & ABOVE Lakhs | |

# प्रतिज्ञापत्र

मी श्री ____________________रा.____________________ता.__________________

जि.__________________ येथील कायम रहिवासी असून माला एकूण_____ अपत्य आहेत. त्यापैकी______मुले व ___मुली आहेत.___________________________ हा प्रथम/ व्दितीय / तृतीय / चतुर्थ क्रमाकांची लाभार्ती अपत्य ( पुरुष/ स्त्री) आहे. तो/ती ____________________________या महाविद्यालय / विद्यालय मध्ये ________________________या अभ्यासक्रमांस शिक्षण घेत असून तो/ती ____________________________________________________ या शिष्यवृत्ती योजनेकरीता अर्ज करीत आहे यापूर्वी माझ्या कुटुंबातील एकूण ______ अपत्यांनी (पुरुष/स्त्री) शिष्यावृतीचा लाभ घेतलेला आहे. त्यांची नावे.

१)

२)

३)

४)

हि आहेत. वर दिलेली माहिती ही पूर्णतः खरी असून त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे त्यामध्ये काही खोटे आढळल्यास माझ्या पाल्याला मिळणारी शिष्यवृत्ती व्याजासह शासनास परत करील अशी हमी देत आहे. तसेच शासननिर्णयानुसार होणाऱ्या कारवाईस मी व्यक्तिशः जबाबदार असेल.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी                                        पालकाची स्वाक्षरी

दिनांक :-

ठिकाण :-